# प्रमाणपत्र

"क्रांतिवीर गणपती दादा लाड त्यांचे जीवन आणि कार्य" हा संशोधन प्रबंध संभाजी नामदेव गोरे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारक पूर्ण केलेला आहे. हा संशोधन प्रबंध त्यांनी पूर्णत: स्वत:च्या प्रयत्नातून व स्वतंत्र दृष्टीकोन ठेवून लिहिलेला आहे. आणि तो पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठाला सादर केला आहे. प्रस्तुत प्रबंध यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

(डॉ. एम्.र. लोहार)
मार्गदर्शक.

......

# प्रा स्ता वि क

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात अनेक थोर व्यक्तींचे योगदान आहे. महाराष्ट्राला देखील अशा थोर व्यक्तींची परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्रातील ब-याच व्यक्तींनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्वत:ला झोकून दिले होते व ही चळवळ महाराष्ट्रामध्ये शेवटपर्यंत जिवंत ठेवण्यास आणि परिणामी स्वातंत्र्य मिळविण्यात त्यांचा फार मोठा सहभाग होता. स्वातंत्र्य चळवळीचा बराचसा इतिहास आपणाला ज्ञात झालेला आहे. पण त्यातील कित्येक व्यक्तींचे योगदान नेमके काय होते याची अधिक माहिती उजेडात यायला हवी. महाराष्ट्रातील अशा थोर स्वातंत्र्य-विरामध्ये श्री. गणपती दादा लाड उर्फ जी.डी. लाड यांच्या कार्याचा मूल्यमापन करणारा संशोधनात्मक प्रबंध लिहिण्याचा प्रयत्न अद्याप कोणी केला नव्हता व त्यामुळे हे संशोधन करणे आवश्यक होते हे लक्षात घेऊन प्रस्तुतच्या प्रबंधामध्ये श्री. जी.डी. लाड यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदान व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये त्यांनी केलेली समाजसेवा यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संशोधनासाठी बरीच प्राथमिक व दुय्यम दर्जाची साधने उपलब्ध होती. पण त्याचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार करुन संशोधन करणे गरजेचे होते. यामध्ये स्वातंत्र्य चळवळ प्रति-सरकारविषयी श्री. जी.डी. लाड यांनी लिहिलेले पुस्तक श्री. जी.डी. लाड यांच्याविषयी प्रकाशित झालेल्या अनेक स्मरणिका, त्या काळातील वर्तमानपत्रे व त्यांच्या आठवणी सांगणारे काही ग्रंथ इत्यादी साधनांचा सर्वंकष अभ्यास करुन हा प्रबंध तयार करण्यात आलेला आहे.

हा शोधप्रबंध तयार करण्यासाठी मला अनेक लोकांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो. सर्वात प्रथम श्री. जी.डी. लाड यांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे. कारण या उतारवयातदेखील त्यांनी जेव्हा जेव्हा मला काही माहिती हवी होती,

तसेच काही घटना विषयी स्पष्टीकरण हवे होते. त्यासंबंधी स्वतःचा वेळ काढून मला वेळोवेळी मुलाखती दिल्या. एवढेच नव्हे तर काही केलेला मी पत्रव्यवहार केला असता त्याला त्यांनी तात्काळ उत्तरे पाठविली. त्यांच्या या बहुमोल सहकार्याशिवाय हा प्रबंध पुरा होऊ शकला नसता. याशिवाय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे सहकारी श्री. आशा पवार, श्री. रामचंद्र लाड, श्री. गोविंद पवार, श्री. आप्पा लाड, श्री. आनंद कुंभार, श्री. निवृत्ती कुंभार, श्री. विठ्ठल पुजारी, श्री. शामराव लाड, श्री. बाबुराव सुतार यांनी देखील माझ्या विनंतीस मान देऊन मुलाखती दिल्या याबद्दल त्यांचेही धन्यवाद मानतो. या शोधप्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. राम र. लोहार यांनी मार्गदर्शन केले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेच माझे मित्र डॉ. प्रकाश कुंभार व पंजाबराव पवार यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मी लिहिलेल्या लघु शोधप्रबंधासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी. आर. कांबळे, प्राध्यापक व्ही.एस्. कदम, डॉ. अरुण भोसले, डॉ. बी.डी. खने, डॉ. एम्.पी. पाटील, डॉ. सौ. पाटील, डॉ. सौ. पारेकर या सर्वांचेच मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

तसेच या प्रबंधासाठी सर्वात महत्वाची मदत व मोलाचे सहकार्य प्रा. दिनकर पाटील व प्रा. जी.पी. माळी यांनी केले, त्याबद्दल मी त्या दोघांचा आभारी आहे.

श्री. विष्णू खाडे यांनी हा लघु शोधप्रबंध वेळेत व व्यवस्थित टंकलेखन करून दिल्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

( एस्.एन्. गोरे )

.....

## अनुक्रमणिका


पृष्ठक्रमांक

प्रकरण पहिले : क्रांतिवीर जी.डी. लाड यांचे बालपण व शिक्षण — १ ते १८

प्रकरण दुसरे : क्रांतिवीर जी.डी. लाड यांची स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी — १९ ते ४३

प्रकरण तिसरे : फिल्डमार्शल जी.डी. लाड आणि तुफानसेना — ४४ ते ७८

प्रकरण चौथे : सातारा प्रतिसरकारची घटना — ७९ ते ९३

प्रकरण पाचवे : क्रांतिवीर जी.डी. लाड - स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय व सामाजिक कामगिरी — ९४ ते १२७

प्रकरण सहावे : उपसंहार — १२८ ते १३३

परिशिष्ट — १४४ ते १४६


......